

लापता
लेडीज चित्रपटाद्वारे
प्रसिद्धी मिळवणारी तरुण व
प्रतिभावान अभिनेत्री नितांशी गोयल भारतीय
फिल्म महोत्सव मेलबर्न(आयएफएफएम)मध्ये
सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीसाठी नामांकित झाली आहे.
इतक्या मोठ्या यशानंतर नितांशीने सोशल मीडियावर
आपला आनंद व्यक्त केला असून, याला आपल्या

# लापता लेडीजची फुल मेलबर्न फेस्टिव्हलमध्ये नॉमिनेटेड

करिअरमधील महत्त्वाचा टर्निंग पॉइंट म्हटले आहे. लापता लेडीजने न केवळ प्रेक्षकांची मने जिंकून घेतली आहेत, तर समीक्षकांकडूनही खूप सारे कौतुक मिळवले आहे. चित्रपटाची कथा व नितांशीच्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर एक चांगलीच छाप सोडली आहे. आयएफएफएममध्ये नॉमिनेशन मिळाल्याबद्दल नितांशी गोयल म्हणाली, 'हा माझ्याकरिता खूप मोठा सन्मान आहे. इतक्या महान प्रतिभावान लोकांबरोबर नॉमिनेट होणे सन्मानाची गोष्ट आहे. मी फुलला जिवंत करण्याच्या संधीसाठी आभारी आहे व या मंचावर माझ्या कामाला मान्यता मिळाल्याने रोमांचित आहे.'